# राजदिप को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई

H.O. : Building No. 46/2251, Suprabhat CHSL., Gandhi Nagar, Opp Mhada Office,
Bandra (E) 400 051.
Email ID : rajdeepcredit@gmail.com Website : www.rajdeepcredit.com Mob No : 7977543356


## दैनंदिन बचत ठेव योजना

थेंबे थेंबे तळे साचे अशी आपल्या प्रचारातील म्हण आहे. त्यानुसार ही ठेव योजना आखलेली आहे. संस्थेचा ओळखपत्र धारक प्रतिनिधी खातेदारांच्या घरी किंवा व्यवसायाच्या ठिकाणी मोबाईल ॲपद्वारे रक्कम जमा करुन त्यांची खाते पुस्तकात रक्कमेची नोंद करेल व रक्कम जमा झाल्याचा एस.एम.एस. खातेदाराच्या मोबाईलवर पाठविला जाईल. खातेदारास एस.एम.एस. द्वारे कळविलेली रक्कम ग्राह्य समजण्यात येईल. दर तीन महिन्यातून एकदा खाते पुस्तक कार्यालयातून तपासणी करुन दिले जाईल. ओळखपत्र धारण करणाऱ्या अधिकृत ठेव संकलन प्रतिनिधीस दैनंदिन ठेवीची रक्कम मोबाईल ॲपद्वारे स्विकारण्याचे अधिकार दिलेले आहेत.

### नियम.

### अ) खाते सुरु करणे.

१) दैनंदिन ठेव योजनेअंतर्गत कोणत्याही व्यक्तीला संस्थेच्या अधिकृत दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधीकडे रु. २० किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम जमा करुन दैनंदिन ठेव खाते सुरु करता येईल.
२) खाते सुरु करण्यापूर्वी खातेदारास अ वर्ग सभासद करुन घेण्यात येईल.
३) दैनंदिन खाते सुरु करताना अर्जदाराने अर्जामध्ये संपूर्ण नांव, पत्ता, सही, व्यवसाय, दूरध्वनी, मोबाईल क्रमांक, ठेवीचा कालावधी (मुदत) त्याचप्रमाणे कायदेशीर वारसाची नोंद करणे जरुरीचे आहे.
४) खातेदाराने वास्तव्याचा पुरावा, रेशनिंग कार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड व स्वतःचा पासपोर्ट साईजचा फोटो संस्थेत देणे बंधनकारक आहे.
५) दैनंदिन ठेव खाते कोणत्याही तारखेपासून सुरु करता येईल.
६) दैनंदिन खाते सुरु करण्याकरिता किंवा रक्कम भरण्याकरिता खातेदारास संस्थेत यावे लागणार नाही. संस्थेचा अधिकृत ठेव संकलन प्रतिनिधी खातेदारास भेटेल व त्यांचे खाते सुरु होईल.
७) संस्थेच्या प्रतिनिधीस ओळखपत्र दिलेले असेल त्यालाच खातेदाराने रक्कम द्यावयाची आहे.

### ब) व्याज दरः

१) या ठेवीवर व्याज काढताना दर महिन्याच्या बाकी रक्कमेवर केली जाईल. व्याज ठेवीची मुदत संपल्यानंतर दिले जाईल. एक वर्ष पूर्ण द.सा.द.शे. ४.००
२) मुदत संपण्यापूर्वी ठेवीदार खाते बंद करण्यासाठी आल्यास शेवटच्या पंधरा दिवसाची रक्कम व्याजासाठी ग्राह्य समजण्यात येणार नाही.
३)कर्ज हप्त्याची रक्कम दैनंदिन ठेवीमधून कर्जास वर्ग होत असलेल्या दैनंदिन ठेव खात्यावर व्याज दिले जाणार नाही.
४) मुदत संपल्यावर पुढील कालावधीचे व्याज मिळणार नाही.

### क) खात्यावर व्यवहार करणे.

खाते सुरु केल्यानंतर संस्थेचा प्रतिनिधी खातेदारास एक पासबुक देईल. त्यावर घेतलेली रक्कम लिहील व सही करील. महिना अखेर पूर्वीची बाकी लिहून पासबुक तपासून दिले जाईल. दैनंदिन ठेवीमध्ये ठरवून दिलेली रक्कम रोज भरणा करणे आवश्यक आहे. एक रक्कमी भरणा करता येणार नाही.

### ड) खाते बंद करणे.

१) सहा महिन्यापूर्वी खाते बंद केल्यास खातेदारास व्याज दिले जाणार नाही. जमा रक्कमेतून कमिशन व रु. १० स्टेशनरी खर्च कपात करण्यात येईल.

**इ) <u>इतर</u>**

१) दैनंदिन ठेव खातेदाराने सलग ९० दिवस खात्यावर रक्कम जमा न केल्यास असे खाते अनियमित (Non Operative) समजण्यात येईल.

२) अनियमित खाते (Non Operative A/c) मुदत संपण्यापूर्वी खातेदाराने पुन्हा सुरु केल्यास हे खाते नियमित खाते (Operative A/c) म्हणून गृहित धर जाईल.

३) मुदत संपून ९० दिवसांपर्यंत खातेदार रक्कम घेऊन न गेल्यास त्या खात्यावर व्याज आकारणी करुन असे खाते (Sundry Creditor) मध्ये वर्ग केले जाईल व (Sundry Creditor) मध्ये वर्ग केलेल्या खात्यावर व्याज दिले जाणार नाही.

४) एकदा दिलेले पासबुक गहाळ झाल्यास त्याबद्दल खातेदारास मागणी केल्यास दुसरे पासबुक मिळेल. त्याकरिता १० रुपये शुल्क आकारण्यात येईल.

५) ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास त्याने नमूद केलेल्या वारसास रक्कम देण्यात येईल. परंतु मृत व्यक्ती संदर्भात सर्व संबंधित कागदपत्रे संस्थेत सादर करावी लागतील.

६) खाते बंद करतेवेळी ठेव संकलन प्रतिनिधीची सही आवश्यक आहे.

**ई) <u>ठेव तारण कर्ज</u>**

१) दैनंदिन ठेवीच्या तारणावर ८० टक्के ठेव तारण कर्ज घेता येईल. परंतु कर्ज रक्कम कमीत कमी रु.१,००० किंवा त्यापेक्षा जास्त असावी. त्यासाठी रीतसर कर्ज मागणी अर्ज संस्थेत भरुन द्यावा लागेल.

२) दैनंदिन ठेव तारण कर्जास द.सा.द.शे. १३ टक्के व्याज आकारण्यात येईल.

३) दैनंदिन ठेवीची व्याजासहित रक्कम ठेव तारण कर्जाच्या रक्कमेइतकी (व्याजासह) झाल्यास ठेवीची सर्व रक्कम ठेव तारण कर्जास वर्ग करण्यात येईल व त्याचे सर्व अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवलेले आहेत.

वरील नियमात कोणत्याही वेळी आगाऊ सूचना किंवा नोटीस न देता बदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवलेले आहे.